<table>
<tr><td rowspan="5">MHPU080000152026</td><td>दाखल तारीख</td><td>:</td><td colspan="3">०७/०१/२०२६</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td>:</td><td colspan="3">०७/०१/२०२६</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td>:</td><td colspan="3">०७/०३/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>००</td><td>०१</td><td>२८</td></tr>
</table>

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२, खडकी, पुणे**

**(पिठासीन अधिकारी – पी. एस. आपटे)**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ४/२०२६** **निशाणी क्र. २३**

<table>
<tr><td colspan="2">प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>अपराध क्रमांक : १२२/२०२५, दिनांक २६/०४/२०२५<br>पोलीस स्टेशन : खडकी</td></tr>
<tr><td>तक्रारकर्ता</td><td>महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, खडकी, पुणे.</td></tr>
<tr><td>महाराष्ट्र शासन/फिर्यादी तर्फे</td><td>श्रीमती जे. आर. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता /<br>श्री. आरती वि. लोहार</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>१. रोहित प्रकाश जाधव<br>वय – ३३ वर्ष, धंदा – सेक्युरीटी<br><br>२. प्रकाश बापु जाधव<br>वय – ६२ वर्ष, धंदा – मजुरी<br><br>३. आशा प्रकाश जाधव<br>वय — ५५ वर्ष, धंदा –गृहिणी<br><br>४. शुभांगी प्रकाश जाधव<br>वय– ३० वर्ष, धंदा – काही नाही</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | आरोपी क्र. १ ते ४ रा. शांताई कॉलनी, साठे वस्ती, लेन नं. १०, यशधाम सोसायटी, धानोरी लोहगाव, पुणे |
| आरोपीकरिता/ तर्फे सादरकर्ता | श्री. पी. एस. जाधव,विधीज्ञ |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | जुन २०१८ ते २६/०४/२०२५ |
| गुन्हा नोंदणी तारीख | २६/०४/२०२५ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २९/१२/२०२५ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०७/०३/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | ०७/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख जर असेल तर | निरंक |

| **अ.क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीनावर सोडल्याची तारीख** | **गुन्हा ठेवल्याचा तपशील** | **निर्दोषमुक्त केले किंवा शिक्षा केली** | **किती शिक्षा दिली** | **खटला सुरु असतांना आरोपी कारागृहात असल्या बाबतचा तपशील** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोहित प्रकाश जाधव | ३५(३) नोटीस | २९/१२/२५ | बी. एन. एस. चे कलम ८५,११५(२), ३५२,३५१(२),३(५) | निर्दोषमुक्त | – | निरंक |
| २ | प्रकाश बापु जाधव | | | | | | |
| ३ | आशा प्रकाश | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जाधव | | | | | | |
| ४ | शुभांगी प्रकाश जाधव | | | | | | |

## सरकारतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | शिल्पा रोहित जाधव | फिर्यादी |

## सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | २२ | फिर्याद |

## बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## महत्वाच्या वस्तू / मटेरियल ऑब्जेक्ट

| अ.क्र. | महत्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्या य नि र्ण य

## (दिनांकः- ०७/०३/२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपी क्र. १ ते ४ यांच्याविरुद्ध प्रस्तुत खटला भारतीय न्याय संहिताचे

कलम ८५,११५(२),३५२,३५१(२) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाच्या कथनानुसार, जुन २०१८ ते २६ एप्रिल २०२५ रोजीपर्यंत आरोपी क्र. १ ते ४ यांनी फिर्यादीस कामे नीट करता येत नाही, तु दिसायला नीट नाही अशे टोमणे मारले व माहेरावरून पैसे घेवुन ये व तुझ्या पगाराचे पैसे घरामध्ये दे असे म्हणुन फिर्यादीच्या चारित्रयावर संशय घेऊन तिला शिवीगाळ करुन हाताने मारहाण करून धमकी देऊन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला अशा आशयाची फिर्यादीने आरोपींविरुध्द खडकी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

३. सदर तक्रारअन्वये खडकी पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदवही क्र. १२२/२०२५ प्रमाणे भारतीय न्याय संहिताचे कलम ८५,११५(२),३५२,३५१(२) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा नोंदविण्यात आला. पो. ह. व्ही. एल. गायकवाड यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासानंतर पुरेसा पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपींविरुद्ध (निशाणी क्र.१४ प्रमाणे) उपरोक्त नमूद गुन्हयाचा आरोप निश्चित करुन दोषारोप पत्रातील मजकूर आरोपीला वाचून समजावून सांगीतला. आरोपी क्र. १ ते ४ यांनी (निशाणी क्र.१५ ते १८ प्रमाणे) आरोप कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

५. अभिलेखावर सबळ पुरवा न आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता

कलम ३१३ (१)(ब) नूसार जबाब नोंदवण्यात आला नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्यातील पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याच्या न्यायिक निकालासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | जुन २०१८ ते दि. २६ एप्रिल २०२५ पर्यंत शांताई कॉलनी, साठे वस्ती, लेन नं. १०, यशधाम सोसायटी, धानोरी लोहगाव, पुणे येथे फिर्यादी शिल्पा जाधव हिला ”माहेरावरून पैसे घेवुन ये व तुझ्या पगाराचे पैसे घरामध्ये दे” असे म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण केली व फिर्यादी यांचा शारिरीक व मानसिक छळ केला शारीरीक व मानसिक छळ केला व त्याअन्वये भा. न्या. सं. क. ८५ सह ३(५) प्रमाणे दंडनीय अपराध केला, हि बाब फिर्यादी पक्षाने सिध्द केली आहे काय? | ... नकारार्थी |
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी यांना मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे भा. न्या. सं. क. ११५(२) सह ३(५) प्रमाणे गुन्हा केला, हि बाब फिर्यादी पक्षाने हे सिध्द करतो काय ? | ... नकारार्थी |
| ३. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन शांतता भंग घडवुन आणण्याचे उद्देशाने अपमानीत केले व त्याद्वारे भा. न्या. सं. क. ३५२ सह ३(५) प्रमाणे | ... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | गुन्हा केला, हि बाब फिर्यादी पक्षाने हे सिध्द करतो काय ? | |
| ४. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारी धाकधपशा केली व त्याद्वारे भा. न्या. सं. क. ३५१ (२) सह ३(५) प्रमाणे गुन्हा केला, हि बाब फिर्यादी पक्षाने हे सिध्द करतो काय ? | ... नकारार्थी |
| ५. | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## निष्कर्षामागील कारणमिमांसा

७. आरोपींविरुद्धचा आरोप सिद्ध करण्याचे दृष्टीने सदर प्रकरणात अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली आहे. साक्षीदार क्र.१ शिल्पा जाधव यांची साक्ष निशाणी क्र.२१ वर नोंदविण्यात आली. याउलट बचाव पक्षाने स्वतःचे बचावासाठी कोणताही तोंडी पुरावा दाखल केलेला नाही.

८. सर्व मुद्दे एकाच घटनेशी संबंधित असल्याने एकत्रीत चर्चेसाठी घेण्यात येत आहेत.

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता –**

९. फिर्यादी या सदर खटल्यातील महत्वपुर्ण साक्षीदार आहेत. फिर्यादी यांनी त्यांच्या सरतपासात सांगितले की, त्या बोपोडी येथे त्यांच्या पतीसोबत राहतात. तसेच त्या कलेक्टर ऑफिस हवेली पुणे येथे कामास आहे. त्यांचे आरोपी क्र. १ सोबत ११ मे २०१८

रोजी धर्माप्रमाणे लग्न झाले होते. लग्नानंतर त्या सासरी नांदायला गेल्या. तेथे त्यांच्यासोबत सासु, सासरे, दोन नंदा व पती राहत होते. पुढे त्यांनी कथन केले आहे की, लग्नात ५ ते ७ लाख रूपये खर्च आला होता व आरोपी क्र. १ यास दोन तोळे सोने दिले होते व सदर साक्षीदार यांना सोन्याचे दागिने देखील दिले होते. आरोपी क्र. १ हे विमाननगर येथे सेक्युरीटीचे काम करतात. लग्नानंतर त्यांना समीक्षा नावाची मुलगी झाली. सासरी असताना त्यांचे आरोपीसोबत वाद झाल्याने त्यांनी खडकी पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली. फिर्याद मधील मजकुराबाबत माहिती असल्याचे कथन करून त्यावरील सही त्यांची असल्याचेही फिर्यादी यांनी मान्य केले. परंतु त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असुन आरोपी हे त्यांना व्यवस्थीत नांदवतील असे सांगितले आहे. आरोपींनी त्यांचा संगनमताने मानसिक व शारिरीक छळ केल्याचे व पैसे मागितल्याचे फिर्यादीने नाकारले आहे. अशाप्रकारे, फिर्यादीने फितुर होवुन अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. म्हणुन सरकारी वकीलांनी उलट तपास घेतला. परंतु, त्यात देखील आरोपींविरुध्द गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही व फिर्यादीतील संपुर्ण मजकुर त्यांनी नाकारला. उलटतपासात फियादीने त्यांच्यात व आरोपींमध्ये तडजोड झाली आहे असे मान्य करून सदर तडजोडीमध्ये त्या आरोपीकडे नांदायला जाणार असल्याचे कथन केले. एकंदरीतच फिर्यादीच्या साक्षीमधुन तिला आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे स्पष्ट होते. त्या अनुषंगाने मुळ फिर्यादी व आरोपींनी निशाणी क्र.२० खाली संयुक्त तडजोड पुरशिस अभिलेखावर दाखल केली आहे. त्यामुळे पटलावरील पुरावा आरोपींना शिक्षा देणेसाठी पुरेसा नाही. गुन्ह्याचे महत्वाचे घटक सिद्ध झालेले नाहीत. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता –</u>**

१०. उपरोक्त विवेचनावरुन अभियोग पक्षाने मुळातच गुन्ह्याचे मुलतत्व संयुक्तिक संशयाचे पुढे जावून आरोपींवरील गुन्हा निर्विवादपणे सिद्ध केलेला नाही. त्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी खालीलप्रमाणे न्यायोचित असा आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ ते आरोपी क्र. ४ यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २४८ अन्वये त्यांच्यावर लावण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिताचे कलम ८५,११५(२),३५२,३५१(२) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ४. | आरोपी क्र. १ ते ४ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ४८०(अ) अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/– चा जामीन कदबा सादर करावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2026.03.09 17:30:32 +0530

दिनांक :–०७/०३/२०२६

**(पी. एस. आपटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) खडकी, पुणे.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | शुभम संजय वायकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | – | मे. श्रीमती पी. एस. आपटे,<br>सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, खडकी, पुणे |
| न्यायनिर्णय जाहीर केलेची दिनांक | – | ०७/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | ०९/०३/२०२६ |